## बॅ. आपासाहेब पंत
**२१ नोव्हेंबर, १९७८**

**माझ्या प्रिय तरूण मित्रांनो,**

तुम्ही ज्या नव्या युगात जन्मला आहात त्याची रोमहर्षकता आणि चित्तथरारकता तुम्हाला जाणवते ना? प्रचंड आणि वेगवान बदल घडत आहेत अशा कालात तुम्ही वाढत आहात. हे युग नवी नवी साहसे करण्याचे आहे, क्षितिजाचा परीघ सतत वाढविण्याचे आहे.

पन्नास वर्षांपूर्वी मीही तुमच्या आताच्या वयाचा होतो. एकच इंजिन असलेल्या विमानाने चार्लस् लिंडबर्ग याने नुकताच अटलांटिक महासागर ओलांडला होता. त्यावेळी मलाही अकस्मात नव्या युगाच्या जाणीवेचे प्रस्फुरण झाले. ज्यांनी चंद्रावर प्रथमच पाय ठेवला आणि मानवाच्या साहस प्रवृत्तीला प्राप्तव्यांची विविध क्षेत्रे मोकळी करून दिली त्यांच्या सांगाती तुम्ही होताच यात मला संशय नाही.

या नव्या युगात जर तुम्हाला यशस्वीपणे जगावयाचे असेल तर सर्वप्रथम आवश्यकता ही आहे की, सभोवताली काय घडत आहे, हे तुम्ही स्पष्टपणे पाहिले पाहिजे. त्यानंतर हे शोधून काढा की, या छोट्याशा भूमंडलावर इतक्या जलद आणि इतक्या मूलभूतरीत्या लाखो आणि करोडो माणसांची जीवनपद्धती ज्या कशाने बदलत आहे ते कोठे आणि केव्हा घडत आहे? का आणि कसे घडत आहे? या सर्वांचा जेव्हा नीट बोध होईल तेव्हाच तुम्ही या महान धाडसात सहभागी होऊ शकाल आणि जीवन कृतार्थ करू शकाल. पण काय घडत आहे हे नुसते समजणे पुरेसे नाही. या नव्या जगात जगण्याची आणि काम करण्याची कुवत तुमच्यात पाहिजे; विकास पावण्याची आणि आनंदाचा उपभोग घेण्याची क्षमता तुमच्या अंगी असावयास हवी. ती क्षमता जर तुम्ही संपादन केली नाही तर या जगात तुम्ही जगू शकणार नाही. जे सुबुद्ध आहेत आणि समर्थ आहेत त्यांच्यासाठीच हे जग आहे.

विज्ञान आणि तंत्रज्ञान ही या नव्या जगाचे गतिसूत्र आणि प्राणशक्ती होत. आपल्या सतत वाढणाऱ्या गरजांच्या पूर्तीसाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा वापर करून माणसाने स्वतःच्या परिस्थितीचा कायापालट केला आहे आणि त्या प्रक्रियेत आत्मपरिवर्तनही घडवून आणले आहे. आधुनिक विज्ञानाच्या प्रभावामुळे माणसाच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी जमीन, हवा, पाणी, जंगले, समुद्र ही सर्व आपआपली रहस्ये खुली करू लागली आहेत. या सर्वांचे उपयोजन विविध उपभोग्य वस्तू आणि सेवा यासाठी तंत्रज्ञ करीत आहेत.

प्रत्येक समाजाला स्वत:चे नियम, नियामके व आचारसंहिता असतात. सतत विकास होत राहावा म्हणून नागरिकांच्याकडे काही क्षमता असाव्यात, त्यांच्याकडून कर्तव्यांचे नीट पालन व्हावे अशी समाजाची अपेक्षा असते. टोळीच्या अथवा जमातीच्या अवस्थेत असलेला समाज आपल्या सभासदांवर काही बंधने व कर्तव्ये लादतो आणि मगच त्या व्यक्तींना समूहजीवनाच्या फायद्यात वाटेकरी होता येते. सरंजामशाही समाजात अशी अपेक्षा केली जात होती की, धनी आणि नोकर, राजा आणि प्रजा यांनी आपआपली विशिष्ट कर्तव्ये करावीत आणि मगच त्यांना सामाजिक संरक्षण आणि इतर फायदे मिळावेत. भारतीय ग्राम–समाज–रचना–हजारो वर्षे बंदिस्त होती. सुतार, लोहार, कुंभार, चांभार, गवंडी, शेतकरी, दुकानदार, मजूर हे एकमेकांवर पूर्णपणे अवलंबून होते आणि त्यांचे हे अवलंबित्व परस्पर उपकारी होते.

आपल्यासभोवती जगभर जो एक नवा समाज जन्माला येत आहे त्याचे नियम आणि नियामके, आचारसंहिता आणि नागरिकांकडून अपेक्षित असलेली क्षमता या नवीन आहेत, त्यांचे क्षेत्र व्यापक आहे. त्यांच्या कसोटीला उतरणे अधिक जिकीरीचे आहे. पण तसे आपण उतरलो तरच हे समाजजीवन सुरळीतपणे चालू शकेल. भारत धरून आजच्या जगाच्या कितीतरी विभागात कितीतरी समस्या आहेत; संघर्ष, तणाव, विफलता, युद्धे, शोषण, भयग्रस्तता, भ्रष्टाचार ही आहेत. याचे कारण हे आहे की या नव्या युगाचे नियम, नियामके, आचारसंहिता कशा प्रकारच्या आहेत हे आपण स्पष्टपणे पाहात नाही आणि स्वत:ला अशा कल्पनेत गुरफटून घेतो की गण समाज अथवा सरंजामी समाज यासारख्या पारंपारिक समाजरचनेत ज्या जुन्या सवयी आणि क्षमता उपयोगी पडल्या त्यांच्यानेच या नव्या समाजातही काम निभेल. विहिरीवर बैलांची मोट हाकण्यास जे कौशल्य लागते व त्यातून जो अनुभव जमा होतो त्याच्या बळावर त्याच जुन्या विहिरीवर विजेचा पंप चालविण्याचा प्रयत्न करण्यासारखेच हे आहे. किंवा बैलगाडी हाकण्याच्या अनुभवातून आणि शिक्षणातून ट्रॅक्टर चालविता येईल असे समजण्यासारखेच हे आहे.

विज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या या नव्या जगाकडे अपरिमित जीवनोर्मी आणि शक्तीसंचय आहे. त्यांचा उपयोग उपभोग्य वस्तू आणि सेवा यांच्या निर्मितीसाठी, प्रवासासाठी, आनंद प्राप्तीसाठी, साहसप्रवृत्तीस वाव देण्यासाठी व नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी करता येईल. तसेच विविध वंशांच्या, श्रद्धांच्या, संस्कृतींच्या आणि मन:प्रकृतींच्या लोकांशी विविधांगी संपर्क साधण्यासाठीही त्यांचा उपयोग करता येईल. एक तर असे घडेल की या जीवनशक्तीची रहस्ये जाणून घेऊन, अनुशासनबद्ध आणि समर्थरीतीने तिला कामी लावू अथवा ती शक्ती आमचा संहार करेल. ज्यामध्ये एकूण दहा कोटीहून अधिक माणसे मारली गेली अशा तीन युरोपीय युद्धांचे (ज्यांची झळ सर्व जगाला लागली असे) उदाहरण आपल्या पुढे आहेच. आज अण्वस्त्रांच्या राशी रचीत असलेल्या अतिबलाढ्य

राष्ट्रांची आणि इतरांची अज्ञानजन्य भयव्याकुलता हीही आपल्या समोर आहे. या लहान ग्रहावरील मर्यादित साधन सामग्रीची ही अमर्याद उधळपट्टी पाहून डोके खरोखर चक्रावून जाते.

उपभोग्य वस्तू आणि सेवा (म्हणजेच संपत्ती) जेव्हा मर्यादित असतात, तेव्हा हावरटपणाचे क्षेत्र मर्यादितच राहते. अशाही परिस्थितीत काही सत्तांध हुकुमशहा होऊन गेले की, ज्यांनी लोभापायी रक्तपात, लुटमार आणि विध्वंस केला. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या प्रभावामुळे सद्य:काली सत्ता, संपत्ती, आणि उपभोग यांची अमाप उपलब्धी झाली आहे. माणसाच्या तृष्णेला मर्यादा नसल्याने त्याच्या विध्वंसाच्या सामर्थ्यालाही मर्यादा राहिली नाही. मोठ्या, मोठ्या शहरांतील माणसांची स्थिती काय आहे हे लक्षात घ्या. तसेच प्रगतीच्या नावाखाली जगभर माणूस नद्या, सागर, वने, भूमी यांची काय विल्हेवाट लावत आहे तेही पाहा. विज्ञान आणि तंत्रविद्या यांच्या या युगात, खरे म्हणजे जगातील प्रत्येक माणसाची प्रत्येक गरज भागविता येईल. पण माणसाच्या लोभीपणामुळे हे करणे उत्तरोत्तर अवघड होत आहे. सत्तेमुळे लोभास छत्र मिळते आणि राष्ट्रवाद, देशप्रेम इत्यादींच्या बुरख्याखाली त्याचे कार्य चाललेले असते.

आज जगात वेगाला महत्त्व आहे. चढाओढ, आश्चर्यचकितता, उपभोग यांचे हे जग आहे. त्याचप्रमाणे भ्रष्टाचार, क्रौर्य आणि शोषण यांचेही हे जग आहे. म्हणून या जगात जीवन शक्य होण्यासाठी विज्ञान आणि तंत्रविद्या यांची रहस्ये तुम्ही आत्मसात केली पाहिजेत. पण याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट ही की, व्यक्तिश: तुम्ही स्वत:च्या लोभवृत्तीवर नियंत्रण घातले पाहिजे. तसेच या नव्या समाजात संघर्ष आणि गोंधळ का माजतात हेही बुद्धि पूर्वक जाणून घेतले पाहिजे. सुख आणि सौहार्द यांचे एक नवे युग आणण्याइतके प्रचंड सामर्थ्य आजच्या समाजापाशी वास्तवात आहे हे लक्षात घ्या.

भूत, भविष्य अथवा वर्तमान युगात युरोप, अमेरिका, आशिया अथवा आफ्रिका यांपैकी कोणत्याही भूखंडावरील समाजात तुम्ही जी काही ठेव ठेवाल त्यापेक्षा अधिकाची निष्पत्ती करता येणार नाही. शंभर रूपयांचीच प्राप्ती असेल आणि दीडशे रूपये खर्च करीत गेलात तर दिवाळखोरीशिवाय दुसरे काय निष्पन्न होणार आहे? ज्या समाजातील नागरिक समाजाला कमी देऊन त्यांच्याकडून अधिक घेऊ पाहतात, समाजाला थोडे अधिकच द्यावयाचे हे आपले कर्तव्य दुर्लक्षितात अथवा विसरतात, अशा सर्व समाजाच्या वाट्याला ही दुरवस्था नेहमीच आलेली आहे. प्रत्येकवेळी जर तुम्ही हे लक्षात ठेवले की, आपण जेवढे घेऊ, त्याहून समाजास अधिक परत करावयाचे आहे तर तुमचा धंदा आणि व्यवसाय काहीही असला तरी तुमच्या हातून चूक अशी होणारच नाही. प्रयत्नांची शर्थ करा आणि जेवढे घ्याल त्यात थोडी भर घालून समाजाला परत करा.

यायोगे सुखी आणि स्थिर समाज निर्माण होईल. हे मिळणे माझा हक्क आहे, असे म्हणू नका. असे म्हणा की, समाजाकरिता हे करणं माझं कर्तव्य आहे. कर्तव्यपूर्तीनंतर हक्कांची अंमलबजावणी आपोआप होईल. पण उलटा क्रम घडणार नाही. दुसऱ्या व्यक्तीने कर्तव्यातील आपला हिस्सा पार पाडेपर्यंत वाट पाहू नका. तुमचे कर्तव्य करा, येथे आणि आज, अहो, या क्षणी!

आधी मी म्हटले आहे की, आधुनिक समाजातील जीवन हे चित्तथरारक आहे. या युगात जगण्यासाठी तुम्ही समर्थ आणि सक्षम असले पाहिजे. तुम्हाला जितके अधिक उंचावलेले जीवनमान पाहिजे असेल, म्हणजेच जितके अधिक आणि चांगले कपडे, अन्न, घर, शाळा, रस्ते, रूग्णालये, मोटारी, स्कूटर, रेडिओ, रेफ्रिजरेटर आणि काय असेल ते पाहिजे असेल तर तितक्या अधिक प्रमाणात कार्यक्षम आणि समर्थ होऊन या सर्व वस्तूंचे अधिक चांगल्या दर्जाचे उत्पादन अधिक मोठ्या प्रमाणावर करून त्या वस्तू योग्य किंमतीत तुम्हांस विकता आल्या पाहिजेत. तुम्ही डॉक्टर, शिक्षक, सुतार, इंजिनिअर, शेतकरी, संघटक, व्यवस्थापक, चित्रकार यांसारखे काम करणारे कोणी तरी असाल आणि जर तुम्ही अकार्यक्षम व असमर्थ असाल तर तुम्हाला उच्चस्तरीय जीवनमान लाभणार नाही. दुसऱ्या कोणी तरी काम करावे आणि तुम्हांस अधिक चांगले जीवनमान मिळवून द्यावे अशी जर तुमची अपेक्षा असेल तर तुम्ही भ्रमात आहात आणि समाजजीवन उद्ध्वस्त करण्याच्या मार्गावर आहात.

या अतीव रोमहर्षक जगात जर टिकून राहावयाचे असेल तर कोणत्याही भ्रमाचा पगडा बसू न देता तुम्हाला सुबुद्धपणे जगले पाहिजे. एक सर्वसामान्य आणि (म्हणू का?) अगदी अनावश्यक भ्रम असा असतो की, सरकार, अथवा पुढारी, अथवा पंतप्रधान, अथवा एखादा सर्वाधिकारी आमच्या इच्छांची पूर्ती करेल. इच्छा जसजशी वाढते, तसतशी सरकारने द्यावे ही अपेक्षाही वाढते आणि आपण सरकारवर अधिकाधिक अवलंबून राहतो. ही वृत्ती निर्भेळपणे सरंजामशाहीशी सुसंगत अशी आहे. जेव्हा राजे आणि राण्या राज्य करीत असत, त्या युगात त्यांनी माफी करावी आणि जगू देण्याची मेहेरनजर करावी अशी (गुलामासारखी?) प्रार्थना माणसे करीत. शासनावर अवलंबून राहावयाची ही वृत्ती सरंजामशाही युगातील अवशेष आहे. आधुनिक कालाशी ती अत्यंत विसंवादी आहे. जे अतिशय गुंतागुंतीचे आहे, ज्याचे विभाग एकमेकांशी निगडीत आहेत, अशा या आपल्या एकात्म जगात, सरकार केवळ अवशिष्ट कार्ये करू शकेल. यापैकी काही आवश्यक असतात आणि महत्त्वाचीही असतात. पण जर नागरिक मूर्ख, अज्ञानी, अकार्यक्षम, आळशी, अंधश्रद्ध, रानवट, क्रूद्ध आणि पोरकट असतील, तर सरकारला आपली कामे नीटपणे करता येणार नाहीत. जसे आपण तसे आपले सरकार. स्वत:च्या भोवती पाहा आणि तुम्हाला आपलेच प्रतिबिंब दिसेल. अन्न, कपडे, सुख, समाधान, स्वातंत्र्य, स्नेह इत्यादी सर्व काही सरकार देऊ शकेल. या महाभ्रमातून

बाहेर या. पुढाऱ्यांची आणि हुकुमशहांची वचने आणि जाहीरनामे काहीही असोत, कोणत्याही सरकारला या गोष्टी करत आलेल्या नाहीत. ते बोलत असतात, ते स्वतःचा अहंकार फुलवण्यासाठी आणि सत्ता संपादनासाठी दुसऱ्या कशासाठी नव्हे. त्यांच्याकडून फसवणूक होऊ देऊ नका. तुमच्या कार्यक्षम, समर्थ आणि अविश्रांत कर्तृत्वाने तुम्हांला नवा समाज निर्माण करावयाचा आहे. तुमच्या विचारांची शुद्धता, स्नेहलता आणि इतरांशी सहकार्य करण्याची कुवत या गोष्टी तुमच्या साहाय्यास येतील.

वरील भ्रमाच्या खालोखाल येणारा आणखी एक भ्रम आहे, सतत वाढणाऱ्या वासनांना घेऊन या उपभोग प्रधान समाजात विस्मय–चकित नेत्रांनी आपण सर्व आज वावरत आहोत. तुम्ही आणि मी जर इच्छांना वाढू दिले नाही तर दुकानातील माल विकला जाणार नाही आणि कारखाने बंद राहतील. म्हणून आपल्या इच्छा उत्तेजित केल्या जातात. घ्या, कपडे घ्या, सायकली, स्कूटर, ट्रान्झीस्टर, टेरेलिन घ्या. नव्या रोमहर्षक जगाचा इच्छा आणि उपभोग हा अंगभूत भाग आहे. या समाजाची मुख्य प्रेरक शक्ती इच्छा आणि उपभोग हीच आहे असे, म्हणता येईल. हा रजोगुणाचा प्रकर्ष आहे. युरोप व अमेरिकेत त्याला फुले, फळे आलेली आहेत. उद्दीपीत झालेल्या अतृप्त इच्छा घेऊन माणसे पहाटेपासून रात्री रशिरापर्यंत अविश्रांतपणे धावत असतात. या शर्यतीत तुम्हांला भाग घ्यावयाचा असेल तर जा, घुसा. पण त्याला आवश्यक तेवढा सुबुद्धपणा आणि कर्तृत्व तुमच्या अंगी असू द्या. तुम्हांला स्कूटर पाहिजे असेल, घर पाहिजे असेल, प्रवास करावयाचा असेल तर कुशलतेने आणि कष्ट घेऊन काम करा आणि मग उपभोग घ्या. सरंजामदारी, जातिप्रधान, टोळीच्या अवस्थेतील पारंपारिक समाजांत उपभोगासंबंधी जे विधी आणि जे निषेध होते ते सर्व आता गेले आहेत. आता मुक्त मनाने उपभोग घेता आणि जे निषेध होते ते सर्व आता गेले आहेत. आता मुक्त मनाने उपभोग घेता येईल. समाजात पाहिल्यानेच आज माणसाला विनासंकोच उपभोग घेता येतो. उपभोगाचे स्वातंत्र्य हे बलस्थान आहे. प्रभावी प्रेरणेचे ते उगमस्थान आहे.

पण कौशल्य आणि कार्यक्षमता तुम्ही संपादन करीत आहात. याविषयी जागरूक रहा. तुम्हांला उपभोग घ्यावयाची इच्छा आहे तशी दुसऱ्यालाही आहे. शोषण, औद्धत्य, वरचढपणाची वृत्ती यांतून जे गोंधळ आणिसंघर्ष निर्माण होतात त्यांनी तुमचे उपभोग शबलित होता कामा नयेत. याची पुरेशी जाण नसेल तर स्पर्धा, संघर्ष, खून, युद्धे, दुःख यांना तुम्ही निर्माण कराल. तुम्हांला पाहिजे असलेल्या उपभोग्य वस्तू आणि सेवा उत्पन्न करण्याची क्षमता तुमच्यांत नसेल तर त्यांच्याशिवाय जगण्यास तुम्ही शिका. हे न करता, जर त्या गोष्टी हिंसेने आणि बळजबरीने तुम्ही प्राप्त करून घ्याल तर त्या प्रक्रियेत दिवाळखोर बनाल. तरीही तुम्ही त्याच रीतीने जगू पहाल तर दुसऱ्यांवर जुलूम, साम्राज्यशाही इत्यादी गोष्टी निर्माण होतील. त्यांचे पर्यवसान युद्धे आणि सर्वनाश यांत होईल. म्हणून समाजास काहीच न देता, आपणांस काही तरी मिळू शकेल, या भ्रमातून जागे व्हा. कारण तो मार्ग

सर्वनाशास नेऊन पोचवितो.

तिसरा आणखी एक भ्रम असतो. विज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या या युगात कसल्याही अनुशासनाशिवाय जगता येईल आणि व्यवहार करता येईल असे वाटणे हा तो भ्रम होय. प्रत्येक प्रकारच्या समाजाला स्वतःची म्हणून एक शिस्त असतेच. या आधुनिक युगाची शिस्त, सुबुद्ध कार्यकुशलता ही आहे. योगः कर्मसु कौशलम्। नव्या वैज्ञानिक रूपातील हा प्राचीनच योग आहे.

ही नवी शिस्त सर्जनशील आहे. ती स्वतःच स्वीकारली असल्याने तिच्यातून निर्माण होणारा समाज स्वार्जित समाधानाने स्थिर स्वरूपाचा राहील. पुढारी आणि सरकार यांनी लादलेली शिस्त हुकुमशाही आणि दुःख यांच्याकडे नेते. जे काम तुम्ही स्विकाराल ते सुबुद्धपणे आणि कौशल्याने करण्यापासून आत्मानुशासन सुरू होते. समाजातील इतर व्यक्तींशी आपण कसे वर्तन ठेवावयाचे यात सुद्धा आत्मानुशासनाचा संबंध येतो. सभोवतालच्या निसर्गाशी तुमच्या होणाऱ्या प्रतिक्रियेतूनही अनुशासनाचे प्रकटीकरण होते. पक्षी, वृक्षवल्लरी, नद्या आणि वने यांच्यावरील प्रेमातूनही ते व्यक्त होते. खऱ्या अर्थाने माणूस होणे आणि इतरांची काळजी वाहणे म्हणजे आत्मानुशासन.

सुबुद्धपणे कार्यकुशल नसताना आणि अंगी शिस्त बाणवली नसताना जर विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या या युगातील जोम आणि सामर्थ्य तुम्ही संपादन कराल तर तुम्ही स्वतःला आणि समाजात राहता त्या समाजाला नष्ट कराल.

आत्मनिरिक्षण करा आणि आज तुमच्या भोवती, प्रत्येक ठिकाणी, जे काही घडत आहे तिकडेही पाहा. निष्काळजीपणामुळे वाहतुक ठप्प होते आणि गोंधळ माजतो हे तुम्हांला दिसते? गुन्हे आणि रोगराई यांना केवळ निमंत्रणच अशी घाणेरडी आणि काळोखी शहरे तुम्हाला दिसतात? धुपून गेलेली शेते दिसतात? या सर्वांची जबाबदारी आम्हांवर नाही तर कोणावर? आम्ही निर्बुद्ध, अकार्यक्षम, अनुशासनहीन आणि निष्काळजी आहोत. माणसाने जेव्हा यंत्र शोधून काढलेले नव्हते अथवा जेव्हा त्याच्याकडे यंत्रचलित बंदूक नव्हती, तेव्हा स्वतःचे अथवा इतरांचे अनहित करण्याची त्याची कुवत मर्यादित होती. आज ती सहस्त्रपट वाढलेली आहे. भयग्रस्त आणि सत्तांध समाज, राष्ट्रे व वैज्ञानिक यांच्या युतीमुळे ही कुवत दिवसेंदिवस वाढतच आहे. युरोप व अमेरिका खंडातील समाज, राष्ट्रे, रशिया, जपान यांच्या हाती विज्ञानातून निर्माण झालेली प्रचंड शक्ती आहे. अधिकाधिक वरचे जीवनमान प्राप्त करून उपभोग घेण्याची त्यांची इच्छा इतकी युद्धे होऊन आणि दहा कोटी लोक मृत्यूमुखी पडूनही पुरी होत नाही. शिस्तहीनतेचे आणि व्यर्थतेचे हे टोक आहे. तुमच्याकडे विज्ञान आणि तंत्रज्ञान जितके अधिक असेल तितके आत्मानुशासन, मानवता आणि प्रेम अधिक प्रमाणात तुमच्याकडे असावयास हवे. तरच समंजस समाज निर्माण करता येतील. राष्ट्राराष्ट्रांमधील बेपर्वा सत्तासंघर्षातून जो गोंधळ निर्माण होत आहे, तो सबंध जगाला विनाशाकडे नेत आहे. हे सर्व

आपणांला स्पष्टपणे दिसत आहे काय? ते थांबविण्यासाठी सुरूवात कोठे करावयाची हे तुम्हांला माहित आहे काय? स्वत:च्या जवळच सुरूवात करावी लागेल. नाहीतर फार दूर जाताच येणार नाही. कृतीमागील तुमची प्रेरणा कोणती, तुमचा हेतू काय हे आधी स्पष्टपणे पाहा. तुम्हांला सत्ता पाहिजे आहे काय? पाहिजे असेल तर ती कोणाकरता? स्वत:करता, तुमच्या जातीकरता, जमातीकरता, सहधर्मीयांसाठी की राष्ट्रासाठी? सत्ता–संपादनातून संघर्ष निष्पन्न होतो, शांती किंवा समाधान नाही. तुम्हांला नफा मिळवून श्रीमंत व्हावयाचे आहे काय? आणि छानछोकीने जगावयाचे आहे काय? या तुमच्या प्रेरणा असतील तर ईप्सित साध्य होण्यासाठी तुम्हाला कार्यकुशल, सुबुद्ध आणि अनुशासनशील झाले पाहिजे. बुद्धी वापरून आणि शिस्तीच्या साहाय्याने ईप्सितप्राप्तीसाठी आवश्यक ती क्षमता जसजसी तुम्ही संपादन कराल तसतसे तुमच्या लक्षात येईल की, हिंसेच्या वापराशिवाय या प्रेरणा सफल होणार नाहीत. हे म्हणण्यात मी असे गृहीत धरले आहे की, तुम्ही केवळ स्वार्थी,अहंकारी आणि उद्धट नसून खरोखरच बुद्धिमान आहात. सत्ता आणि संपत्ती संपादण्याच्या तुमच्या प्रेरणा आणि भोवतालच्या इतर व्यक्तींच्या तसल्याच प्रेरणा यांची टक्कर होईल. शांतता आण सहकार यांविषयीच्या प्रेरणा नेहमीच संघर्ष आण गोंधळ निर्माण करतात. आज तुमच्या सभोवती सर्वत्र हेच दिसत आहे. हिंसा, क्रोध, द्वेष, चढाओढ, असूया यांच्यातून एक स्थिर, समंजस, समाधानी समाज निर्माण करता येईल या भ्रमातून बाहेर या. जडवाद आणि यंत्रयुगातील उत्तेजकता या योगे हिंसाचार ही नित्याची बाब बनली आहे. शहरातून माणसे पळविली जात आहेत आणि शहरी गनिमी सैनिकांना तर सर्वच उद्ध्वस्त करावयाचे आहे. भरभराटीत असलेल्या जर्मनीत बैडर–माइनहॉफ यांची सोनेरी टोळी किंवा इटली आणि जपान येथील लाल पथके यांविषयी तुम्ही ऐकले आहे काय? या संघटना म्हणजे वैफल्य, कंटाळा, क्रोध व द्वेष यांच्या युगाची प्रतिके होत. तसेच नागरी समाजाच्या दुखण्याची ती लक्षणे होत.

निरखून पहा. हिंसा ही अखेर स्वत:मध्ये असते. तुम्ही समाजाला हिंसक बनविता, त्याची हिंसकता वाढते आणि शेवटी ती तुम्हाला खाऊन टाकते. तुम्ही स्वत: किती चिंतातुर, क्रूद्ध, वंचक, आळशी, गर्विष्ठ व उद्धट आहात ते पाहून घ्या. जसे तुम्ही आहात तसाच तुमचा समाजही आहे.

या आपल्या लहान जगातील प्रत्येक भाग आता दुसऱ्यांशी जोडलेला आहे. आणि सर्व भाग एकमेकांवर अवलंबून आहेत. दोन्ही अमेरिका, आफ्रिका, आशिया, युरोप, रशिया, चीन, जपान, भारत, तसेच अरब, आफ्रिकन लोक, पाकिस्तानी, चिनी, हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती, बौद्ध, ज्यू, जैन हे सर्व एकमेकांस बांधले गेलेले आहेत. एका विभागास काही दुखापत केलीत तर दुसरीकडेही इजा पोचते. अशा या जगात, अशा या एकात्म जगात हिंसा ही मूर्खपणाची, अविवेकी आणि अव्यवहारी

आहे. राष्ट्रे युद्धाची तयारी करतात आणि मागाहून एकमेकांचा नाश करतात ते पाहिल्यावर हिंसाचार किती मूर्खपणाचा आहे हे लक्षात येते. जर्मनी आणि जपान यांमध्ये घडले त्याप्रमाणे युद्धात नाश पावलेलया राष्ट्रांना अधिकच आर्थिक मदत केली जाते. उद्देश हा असतो की उद्योगधंदे, कारखानदारी आणि व्यापार उदीम यांचा अप्रतिहत संचार चालावा. समाजघटक एकमेकांवर आत्यंतिकपणे अवलंबून असल्याने कोणत्याही समाजाच्या अंतर्व्यवस्थेत हिंसा ही निरूपयोगीच असते. भिन्न, भिन्न समाजाच्या संदर्भात ती फायदेशीर ठरते. पण केवळ त्यांनाच की, जे शस्त्रास्त्रांची निर्मिती करतात आणि प्रचंड नफ्यासाठी त्यांची विक्री करतात. मृत्यू आणि विनाश यांचा व्यापार करणाऱ्या प्रचंड आणि सामर्थ्यवान कंपन्या आज जगभर कार्यरत असून, त्यांनी हैदोस माजविला आहे. परस्परांशी युद्ध करणाऱ्या दोन्हीही बाजूंना शस्त्रे आणि दारूगोळा एकाच ठिकाणाहून विकला जातो. रशियाने इथिओपिया आणि सोमालिया यांच्या बाबतीत असे केले होते. अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड, बेल्‌लियम् ही राष्ट्रे तर नेहमीच ही गोष्ट करीत असतात. सत्तेच्या या खेळाचा जगभरच्या सुबुद्ध लोकांना आता उमज आला आहे आणि त्यामुळे त्यांचा उबगही आला आहे. शक्यता आहे असे घडो की, तुम्ही, म्हणजे ही नवी पिढी स्वत:ला जाग आणेल आणि हे सर्व थांबवेल.

या अत्यंत चित्तथरारक नव्या युगात तुम्हांला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेल. बेकारी, दारिद्र्य, विषमता, पिळवणूक, भ्रष्टाचार, कंटाळा, हिंसाचार, क्रोध, द्वेष, फसवणूक इ. मरू घातलेल्या एका समाजव्यवस्थेचे पाठीमागे रेंगाळणारे ते अवशेष आहेत. जाती, श्रद्धा, संस्कृती यांचा उपयोग करून त्या व्यवस्थेने माणसास माणसापासून तोडले आणि युद्धे व विध्वंस यांचा अभिमान वाहिला. आता आलेल्या विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या नव्या युगापाशी इतकी प्रचंड शक्ती आणि सामर्थ्य आहे की, त्यांच्या साहाय्याने जुन्या जमान्यातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय अशा सर्व संस्था ते पार बदलून टाकील.

या नव्या युगातील तुमची जबाबदारी सांभाळण्यासाठी तुम्हांस सुबुद्ध, लायक आणि समर्थ बनले पाहिजे. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांनी मुक्त केलेली ही दुर्दमनीय शक्ती मनाला कशी अस्वस्थ करून सोडते हे समजण्यासाठी सर्वप्रथम आपणांस सुबुद्ध झाले पाहिजे. मन एकसारखे उद्दीपित होत राहते. मग क्षुब्ध होते. परिणामत: या युगाच्या शक्तीचे सामर्थ्य अथवा बलिष्ठपणा हे जे रूप तिकडे मन आकर्षित होते. हे सर्व होत असताना मन बेभान होते. त्याची दमछाक होते. ते गर्विष्ठ, उद्धट, क्रुद्ध आणि हिंसक बनते. जर तुम्ही सुबुद्ध नसाल तर खरोखर चालू युगाचा शक्तिस्त्रोत तुमचा सर्वनाश करेल. क्रोधी, वैफल्यग्रस्त, हिंसक, गोंधळलेले, उद्धट मन प्रत्येक ठिकाणी गोंधळ आणि तणाव निर्माण करेल आणि त्याचा अखेरचा टप्पा विनाश हा असेल.

म्हणून तुम्ही जागृत झाले पाहिजे आणि बुद्धीचे एक नवीन परिमाण प्राप्त करून घेतले पाहिजे

की, ज्याच्या योगाने शक्तीचा हा प्रचंड स्त्रोत तुमच्या नियंत्रणाखाली येईल. क्रोध, द्वेष, गर्व, अज्ञान यांचे अभ्र नसतील तरच मनाला बुद्धीचे हे नवीन परिमाण लाभेल. जे मन स्वच्छ, शांत व स्नेहार्द्र असते, तेच सुबुद्ध होऊ शकते. मन सुबुद्ध असल्याशिवाय, बुद्धी करूणेने पूरित असल्याशिवाय विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या या नव्या युगाच्या असीम शक्तीचे आणि सामर्थ्याचे तुम्ही नियंत्रण करू शकणार नाही.

आज तुमचे स्वत्व अथवा पृथगात्मत्व हे जातीने, धर्मश्रद्धांनी, वर्णाने अथवा राष्ट्रियत्वाने मर्यादित झाले आहे. ही गोष्ट किती अप्रस्तुत आणि अस्थानी आहे हे जागे होऊन एकदा नीट पाहून घ्याल काय? विज्ञान आणि तंत्रविज्ञा यांच्या या युगात जगातील प्रत्येक व्यक्तीशी तुम्ही व्यापार आणि उद्योगधंदे, ज्ञान आणि संस्कृती यांच्याद्वारा जोडले गेले आहात. सुदूर संपर्काची साधने, विमानातून प्रवास, ट्राझिस्टर, दूरदर्शन इत्यादी नवनवे शोध, अगदी तुमच्या दिवाणखान्यात, नवीन विचार, रीतीभाती, संगीत, खेळ, साहित्य, नाट्य इत्यादींना आणून सोडीत आहेत अशा वेळी तुम्ही केवळ हिंदू अथवा ख्रिश्चन अथवा मुसलमान अथवा बौद्ध कसे शकाल? कृष्णवर्णिय, पिंगवर्णीय, श्वेतवर्णीय, अथवा पीतवर्णीय कसे असू शकाल? तुम्ही केवळ भारतीय अथवा केवळ पाकिस्तानी कसे असणार? सुबुद्ध व्हा. सहृदय व्हा आणि पहा व अनुभव घ्या की, तुम्ही व इतर सर्व मिळून जे कोणी तुम्ही आहात तेच खरोखर तुम्ही आहात. तुमचे स्वत्व हे जगड्व्याळ आहे, विश्वस्वरूप आहे. कारण जगाशिवाय तुम्ही असूच शकत नाही. टिकू शकत नाही. हे जर तुम्ही जगाशिवाय पाहाल आणि अनुभवाल तर तुमच्यात एक नवे स्वत्व जागृत होईल आणि या नव्या जगात जगण्यासाठी एक नवे सामर्थ्य तुमच्यापाशी येईल.

स्वत्व अथवा पृथगात्मता यांच्या या समस्येने आज जगात अराजक माजले आहे. ज्या दुसऱ्याला तुम्ही भीता, ज्याचा द्वेष करता, शोषण करता, खूनही करता त्या दुसऱ्या पासून आपण सर्वस्वी अलग आहोत असे अज्ञानजन्य भ्रमाने तुम्ही मानीत आला आहात. आता विज्ञान आणि तंत्रविद्या यांनी तुम्ही व तो दुसरा यांना एकमेकांशी जोडून परस्परावलंबी केलेले आहे. मग तो दुसरा पिंगवर्णी, कृष्णवर्णी, श्वेतवर्णी, वा पितवर्णी, का असेना, किंवा तो दुसरा मुसलमान, हरिजन, ब्राह्मण वा ज्यू का असेना, आता तुमचे ते जुने स्वत्व, तो जुना मी पणा टिकून राहील कसा? हे सर्व स्पष्टपणे तुम्हाला प्रतीत झाले आहे काय? जर झाले असेल तर तुमच्या हृदयातील द्वेष आणि खुनी प्रवृत्ती, शोषणेच्छा आणि युद्धप्रवृत्ती यांचा मूर्खपणा कायमचा हद्दपार होईल. पण ज्यांचा मी उल्लेख केला आहे ते अज्ञान आणि भ्रम यांच्यातच मशगूल होऊन राहाल तर तुम्ही हत्या करीत राहाल आणि तुमचीही हत्या होईल आणि केवळ दुखःच वाट्याला येईल.

हजारातील एकाला जरी या सुबुद्धपणाची आणि सहवेदनेची जाग आली तरी नवे जग लवकरच आणि सुलभपणे अस्तित्वात येईल. काहीही झाले तरी नवे जग अस्तित्वात येणारच आहे. पण त्याची नीट घडी बसेपर्यंत जे कष्ट आणि दु:खे भोगावी लागतील ती कमी करावीत. सुसह्य करावीत यासाठी तुम्हांस सुबुद्ध, सद्य आणि समर्थ व्हावे लागेल आणि स्वत:च्या कृतींचे दायित्व पूर्णपणे पत्करावे लागेल. असे म्हणतात की, लाखातील एक माणूस जरी अशा रीतीने प्रबोधित झाला तरी हे परिवर्तन घडवून आणण्यास तो समर्थ ठरेल. लाखातील हा एक माणूस होण्याइतके धैर्य आणि बुद्धी तुमच्याकडे आहे काय, हा प्रश्न तुम्ही स्वत:ला विचारा. तुमच्या भोवताली सर्वत्र भ्रष्टाचार, क्रोध, द्वेष असूया ही असताना मौन पत्करून करूणामय होण्याइतकी बुद्धी आणि धैर्य तुमच्याकडे आहे काय? असा प्रश्न स्वत:ला विचारा. भोवतालचा जनसंमर्द वैफल्यग्रस्त, सर्वतुच्छवादी, उदासीन आणि उथळ प्रवृत्तीचा असताना त्यापासून बाजूला उभे राहून अनन्ताच्या असीम अनुग्रहाचा स्वीकार करण्याची तुमची तयारी आहे काय?

हे साहस कठीण आहे आणि रोमहर्षकही आहे. या मार्गावरून चालू लागलात म्हणजे सुरूवातीस पाऊले ठरणार नाहीत. पण लवकरच अन्तहीन यात्रेचा आनंद सदैव तुमच्या सांगाती राहील.

म्हणून उठा, जागे व्हा, जे उच्चतर भवितव्य तुमची प्रतिक्षा करीत आहे, त्याचा वेध घ्या.

❑❑❑